Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
One Time Serial Rights

# नाटक

वयाच्या बारा वर्षांच्या आत माझ्या मैत्रिणींनी व मी खऱ्या नाटककारांनी काढली नसतील इतकी नाटकमंडळं काढली. नाटक ह्या प्रकरणाला किंवा मोठ्या माणसांच्या भाषेत 'खुळेपणाला' केव्हा सुरवात झाली हे मला आठवत नाही. परंतु बहुधा वयवर्षे दोनपासून झाली असावी. तेव्हा मला कोणीतरी बाळकृष्ण केले होते म्हणे.

मे महिन्याच्या सुट्टीत आम्ही सर्व "मोकाट सुटलेले" किंवा "रिकामटेकडे" असल्याने आमच्या नाटकप्रकरणाला ऊत येत असे. नाटकमंडळीचं एकमत, 'नाटक करायचं' ह्या एका मुद्द्यावरच होतं. तिथून पुढे मतभेद, भांडणं, वाद... इत्यादी... इत्यादी. थोडक्यात मोठ्या माणसांच्या कंपनीएवढेच राजकारण आमच्याही नाटकमंडळात चालत असे. फारच मतभेद झाला म्हणजे एक कंपू फुटून वेगळं नाटकमंडळ काढीत असे. "बालनाट्य" "विविध नाटक मंडळी" "माडीवाले कॉलनी नाटक-मंडळ" ही काही नावं मला आठवतात. "माडीवाले नाटक मंडळ" हे "पुरंदरे कॉलनी नाटक" मंडळाविरुद्ध स्थापन केले होते. दुर्दैवाने माडीवाले कॉलनीतील एकी फार दिवस टिकली नाही.

आम्हा मुलींच्या दृष्टीने नाटक करण्याचे तीन मुख्य हेतू होते. चांगले कपडे घालणे, दागिने व मुकुट घालणे आणि मेकअप लावणे. प्रत्यक्ष नाटकाला आमच्या दृष्टीने कमी महत्व होते. नाटकाचा प्रारंभ हा मुकुट बनविण्याने होत असे. पुठ्ठा कापून त्याला आकार देण्यात येई. त्यावर सिगारेट पाकीटातील चांदी, रंगीन कागद, बटणं (म्हणजे रत्न !) इत्यादी चिकटून मग मुकुट बनवला जाई. खोटे दागिने, मण्यांच्या माळा अशा गोष्टीही गोळा केल्या जात.

नाटकाच्या तयारीचा पुढचा महत्वाचा भाग म्हणजे कपडे जमवणे. त्याकाळी 'एकनूर आदमी व दसनूर कपडा' अशी पद्धत नव्हती त्यामुळे प्रत्येक मुलीकडे एखादाच ठेवणीतला परकर - पोलका असे किंवा एखादाच छानसा फ्रॉक असे. तो आम्हाला नाटकासाठी 'गुधडावयाला' द्यायला आया तयार नसत. बऱ्याच प्रयत्नाने आम्ही

एक-दोन परकर-पोलके (तेही कुणाला तरी लहान झालेले) व एरवादी बोहारणीला द्यायला ठेवलेली साडी मिळवीत असू.

मेकअपची तर आम्हाला प्रचंड हौस. टॅल्कम पावडर कुठूनतरी मिळत असे. पण लिपस्टिक व रूज ह्या दोन गोष्टी त्याकाळी सदाशिव पेठेत निषिद्धातच जमा होत्या. उषा नावाच्या एका मुलीकडे एक वापरलेली लिपस्टिक होती. त्या लिपस्टिकच्या जोरावर ती फार भाव खायची. तिला धडा शिकवायचा आणि नाटकालाही पाहिजे ह्या दोन कारणांनी मी ह्या दोन गोष्टी आई-वडील व नातेवाईकांकडे हजारो वेळा मागितल्या असतील पण, “लिपिस्टिकने मडमांचे ओठ काळे पडतात. तुम्हाला ग कशाला ते चाळे ?” इत्यादि उपदेश ऐकवले जात. (मी पाहिलेल्या मडमांचे ओठ छान गुलाबी होते !) त्या काळी मी लिपस्टिक व रुजसाठी जंगजंग पछाडले पण शेवटपर्यंत काही मला या दोन गोष्टी मिळाल्या नाहीत.

आम्ही शेवटी मग रंगीत खडू कुटून रुज बनवण्याची कल्पना काढली. लिपस्टिकही काही खडूंची बनवली होती. पण ते काही नीट जमलं नाही. कारण बोलायला लागलं की खडू तोंडातच जात असे.

मुलग्यांना नाटककंपनीत घ्यायला आम्हाला आवडत नसे. कारण मुलगे सांगितलेलं काम कधी व्यवस्थित करत नसत. उदाहरणार्थ असं की, त्याचं काम संपलं तरीही मारुती उड्याच मारत राही. पण मुलांना नाही घेतलं तर रावण, भीम, बकासूर, मारुती, इत्यादी… इत्यादी मुलींना नको असलेले पार्ट कोण करणार ? तेव्हा नाईलाजाने मुलांना घेतले जाई.

आता नाटक म्हणजे खरं तर वेगवेगळे नाच, प्रवेश ह्यापैकी काय करायचं हे ठरवणं. ही खरी भांडणाची सुरुवात. कारण प्रत्येकीलाच चांगले कपडे व दागिने, विशेषतः मुकुट घातलेल्या बाईचे काम पाहिजे असे तेव्हा सीता, द्रौपदी, रुक्मिणी इत्यादी भूमिकांसाठी हाणामाऱ्या व्हायच्या. मला एक छोटा प्रवेश आठवतो. त्यात जगाची, बनाची, पावसाची इत्यादी… इत्यादी बऱ्याच राण्या होत्या. त्यामुळे प्रत्येकीला ओळीने मुकुट घालायला मिळत असे. तेव्हा तो प्रवेश प्रत्येक नाटकात हमखास असे.

एवढ्या भानगडीतून नाटक वाचलं तर मग नाटक करायचा दिवस ठरायचा. नाटक बहुधा आमच्या दिवाणखान्यात होत असे. त्याला कारण एवढेच की, इतरांच्या विरोधाला न जुमानता माझे वडील परवानगी देत व इतरांचे आई-वडील कायम नाही म्हणत. मग एक दोरी, खिडकीच्या गजाला एक टोक, तर समोरच्या दरवाजाला

ठोकलेल्या खिळ्याला दुसरे टोक अशी बांधण्यात येत असे. त्यावर आईवडिलांच्या नकळत पळवून आणलेल्या चादरी, साड्या, पांघरुणं इत्यादी वस्तू टाकल्या जात. मधली चादर स्टेजची व बाजूच्या दोन चादरी विंग किंवा ‘कपडे बदलण्याची जागा’ ह्यासाठी राखीव असत . चादरी जमीनीपर्यंत पोहोचत नसल्याने खालची एक-दोन फूट जागा मोकळी असे. चावट प्रेक्षक खालून सारखे डोकावून पहात असत ! दरवाज्याच्या खिळ्याला बांधलेली गाठ, पडदा जरासा जोरात ओढला की सुटत असे. आणि मग विंगमधले अर्धवट कपडे घातलेले नटनटी दृष्टीस पडत. कधीकधी ह्या नटनटींची व पडदा ओढणाऱ्या मुलांची (अर्धवट कपड्यातच) मारामारी सुद्धा जुंपत असे. माझ्या मते काही प्रेक्षक हाच बघण्यासाठी किंवा घडवून आणण्यासाठी येत.

नाटकासाठी आम्ही बसची तिकिटं साठवत असू. त्यांच्या मागे एक पैसे व दोन पैसे अशी किंमत लिहिली जाई. एक पैसावाले जमीनीवर व दोन पैसेवाले खुर्चीवर अशी व्यवस्था होती. नाटकाच्या आदल्या दिवशी आम्ही तिकीटविक्रीचा प्रयत्न करीत असू. पण नाटकाला कधी मोठ्या माणसांपैकी कोणी आल्याचं मला आठवत नाही. बाकी नाही म्हणायला बाबा एकदम पाचसहा तिकिटं घ्यायचे व पहिल्या एक - दोन प्रवेशाला येऊन बसल्यासारखं करून जायचे. मग जे प्रेक्षक उरायचे ते म्हणजे आम्हाला घाबरणारी धाकटी भावंडं. आईच्या भाषेत हे, ‘मारून मुटकून आणलेले’ प्रेक्षक आमच्या भीतीने बसून राहायचे. प्रत्यक्ष नाटकाच्या दिवशी नाटक कंपनीतील एरवादी मुलगी बाहेर उभी राहून या प्रेक्षकांना गप्प ठेवायचे आणि मुख्यतः बसवून ठेवायचे काम करीत असे. प्रेक्षक कायम वळवळ करून पळून जायच्या प्रयत्नात असत. एक एक जण, पाणी पिणं, बाथरूमला जाणं अशा काहीही निमित्ताने जात असे. तो बाहेरच्या बाहेर नाहीसाच होई.

नाटकाच्या दिवशी एक मुलगा डोअरकीपर व एक पडदा पडणारा व्हायचा. पडदा पाडणाऱ्या त्या मुलाकडे देवघरातून चोरून आणलेली घंटा असायची. तिसऱ्या घंटेनंतर, ‘मारून मुटकून’ आणलेले प्रेक्षक आम्हीच (फुकटात) दिलेली तिकिटं घेऊन येत असत. मग “नमन करू सर्वांना” अशा तऱ्हेच्या काही गाण्यांनी नाटकाची सुरवात होत असे. अर्थातच ह्या गाण्यातही एक मुकुट घातलेली मुलगी असेच.

मे महिन्याच्या शेवटी - शेवटी प्रेक्षक मिळणेच बंद होई. लहान भावंडे धमकावण्याना जुमानणं बंद करीत. म्हणून मग ‘घराचे अंगण’ हेच थिएटर अशी मॉडर्न आयडिया आम्ही काढली. त्यामुळे निदान पडदा, दोरी ह्यांच्या भानगडी तरी मिटल्या.

अशाच एका नाटकात मी भांडून 'सीता' झाले होते. त्या नाटकात मागचे अंगण ही लंका, अडगळीची खोली ही सीतेला पळवून आणून ठेवायची जागा असं ठरलं तेव्हा रावणाने मला म्हणजे सीतेला फरफटत आणून अडगळीच्या खोलीत टाकलं. कारण त्याला मला उचलून घेणं शक्य नव्हतं. मी "सोडवा, सोडवा" वगैरे ओरडले. ह्यानंतरची सर्व अॅक्शन मागच्या अंगणात झाली. तिथे रामाचे आणि रावणाचे तुंबळ युद्‌ध चालले होते. माझ्यावर पहारा करणाऱ्या 'राक्षसिणी' सुद्‌धा कंटाळून युद्‌ध पहायला गेल्या आणि मला मात्र त्या अडगळीच्या खोलीत बसायला लागलं. त्यातच दोन लाल मुंग्यासुध्दा चावल्या. त्यामुळे, "ह्यापुढे माकड किंवा राक्षसीण होईन, पण सीता होणार नाही" असा मी पण केला. एकदा असंच सबंध घर हेच स्टेज मानून आम्ही चोर - शिपायाचं नाटक केलं. चोराला फाशी द्‌यायला अंगणातल्या आंब्याच्या झाडाला खराखरा फास टांगला. नशीबाने माझ्या वडिलांनी तो पाहिला आणि आम्हाला रागावून त्या दोऱ्या कापून टाकल्या !

आमच्या नाटकात कायम भानगडी होत. उदारणार्थ : केरसुणीचे हिरे काढून केलेले धनुष्यबाण पहिल्या दोन राऊंडमध्येच मोडत. मग राम आणि रावण ह्यांचे भीषण युद्‌ध बुक्क्यांनी सुरु होई. लाथा मारण्यात व केस ओढण्यात त्याचा शेवट होई. आपल्याला हरायला पाहिजे याचा विसर तर रावणाचे काम करणाऱ्या पार्टीला नेहमी पडायचा. मग खऱ्याखुऱ्या मारामारीत रूपांतर व्हायचे. मुलांना मारामारीची खुमखुमी असेच. मग माकडं, राक्षसिणी वगैरे (एकदा सीता सुध्दा !) नाटक आहे हे विसरून त्या 'युध्दात' पडत असत.

एकदा आम्ही 'लंकादहन' नाटक करायचं ठरवलं. माझ्या वडिलांचा घरचा बिझिनेस असल्याने आमच्या घरी खोकी असत. ती मांडून मधल्या अंगणात लंका बनवली. त्यावर भिकारदास मारुतीच्या देवळाजवळच्या म्हशीच्या गोठ्यातला कडवा चोरून आणून ठेवला. मारुतीच्या शेपटाला, म्हणजे एका दोरीला चिंध्या बांधल्या. पण त्या पेटेनाच. तोच कुणाच्या तरी सुपीक डोक्यात रॉकेल ओतण्याची कल्पना आली. कोठीच्या खोलीतून चोरून रॉकेलची बाटली आणताना मी पकडले गेले. "वशाड पडली मेल्याची तोंडा ! लंकादहन करतत. घरांक आग लावतले" वगैरे सरबत्ती झाली. आईने बाहेर येऊन त्या नाटकाला बंदी घातली आणि नाटक - मंडळींना आपापल्या घरी पाठवलं. नंतर मी शहाणी झाले. एकदा 'गड आला पण सिंह गेला !' हा प्रयोग करताना तानाजीसारखे घोरपड पाठवून वर चढायला, पहिल्या मजल्यावरील गॅलरीला दोरी बांधली. यावरून तानाजीने सरसर वर चढावे ही कल्पना पण ती

अमलात आणण्याआधी मी बाबांची परवानगी मागितली. त्यांनी ती सपशेल नाकारल्याने मग आमच्या तानाजीला जिन्याच्या कठड्याने चढूनच कडा चढल्याची तहान भागवावी लागली.

तानाजीचं धड, डोकं कापल्यानंतर तलवार फिरवीत राहिलं अशी गोष्ट आहे. हा सीन कसा उभा करायचा ह्या विषयावर आम्ही गहन चर्चा केली होती. शेवटी तानाजीच्या डोक्यावर पिशवी घातली म्हणजे, त्याचं डोकं कापलं गेलं आहे हे लोकांना कळेल असं आम्हाला वाटलं. 'तानाजीला दिसणार कसं ?' हा प्रश्न कुणालाही सुचला नाही. तानाजी पुठ्ठ्याची तलवार तुफान फिरवीत स्टेजवरून बाहेर पडून प्रेक्षकात गेला आणि प्रेक्षक उठून गेले. ते काही तानाजीला घाबरून नव्हे, कारण ते निमित्तच शोधत होते !

पुढेपुढे आम्ही 'सोफेस्टीकेटेड' झालो. नाटक कपडे, दागिने व मेकअप यासाठी नसतं. त्यातील संभाषणाला महत्त्व असतं, त्यात नायक, नायिका व खलनायक असतो वगैरे... वगैरे आम्हाला समजू लागलं. हिंदी सिनेमाचा परिणाम म्हणून म्हणा किंवा रडण्याचे आम्हाला आकर्षण म्हणून म्हणा, आमची हिरॉईन ही कायम रडवी असायची. हिरॉईन 'ट्रॅजिकच' पाहिजे अशी आमची ठाम कल्पना असल्याने तिच्यावर संकटांचा डोंगर कोसळत राहावा अशी आमच्या नाटकाची रचना असे. तिचा नवरा किंवा मुलगा टायफॉईडने आजारी असे, तिच्या मुलाला अपघात होई, तिच्या नवऱ्याची नोकरी तरी जाई अथवा वडिलांना सतत दम्याचा त्रास तरी असे !

हीरोने एकदातरी मारामारी केलीच पाहिजे अशी आमची कल्पना होती. आमच्या नाटकात वर्तमान, ऐतिहासिक व पौराणिक काळ मिसळले जायचे. म्हणजे असं की, म्युनिसिपालिटीत नोकरी करणारा हीरो हा वाटेत एखाद्या स्त्रीच्या अब्रूरक्षणासाठी तलवार काढून मारामारी करत असे. (अब्रू म्हणजे काय हे खरं तर आम्हाला ठाऊकच नसे. पण ती महत्त्वाची असून स्त्रीच्या अब्रूरक्षणासाठी पुरुष जीव देतात हे मात्र आम्हाला नक्की माहीत होत.)

सर्वांना खरी हौस असे ती व्हिलनच्या कामाची. एका मे महिन्यामध्ये आमचा व्हिलन कायम एका डोळ्यावर पट्टी लावायचा, नंतर मग व्हिलनने एक भुवई वर उडवायची फॅशन आली होती. आम्ही सर्व आरशासमोर उभं राहून भुवई उडवायची प्रॅक्टिस करत होतो. व्हिलन अगदी, "दुष्ट वाक्य बोलताना मोक्याच्या क्षणी भुवई उडवतो" अशी कल्पना होती. पण प्रत्यक्षात बोलताबोलता सहज भुवई उडवणं कुणाला जमलंच नाही. त्यामुळे

व्हिलन वाक्य मोक्याच्या ठिकाणी तोडून, काही सेकंद भुवई उडवण्यात घालवून तुटक वाक्य बोलायचा. उदारणार्थ: “मै आज रातको उसको (भुवई उडवण्याची काही सेकंनदाची गॅप) खलास कर दूंगा.”

आमचा व्हिलन कायम हिंदी बोलत असे. तेही आम्हीच, पुण्याला राहणाऱ्या मुलांनी लिहिलेलं असल्यामुळे अगदी भयानक असे. थोडक्यात म्हणजे प्रत्येक नाटकात एक हिंदीचा आणि एक व्हिलनने केलेला, असे दोन खून असत. त्याचं उदाहरणच द्यायचं तर पुढीलप्रमाणे :

औरंगजेब (कोळशाने दाढी रंगवलेला) शाहिस्तेखानाला म्हणतो.

“शिवाजीने तेरी फक्त बोटंच क्यू काटी रे ?”

“वो दख्खनका चूहा पिंजरेमे कायकू नाही पकडा रे ?”

आता चूहा म्हणजे उंदीर. तेव्हा तो पिंजऱ्यातच पकडणार अशी आपली आमची समजूत !

मुलांना व्हिलनच्या कामाचा तुटवडा नव्हता पण मुलींना दुर्दैवाने व्हिलनच्या भूमिका नव्हत्या. कैकयी व आनंदीबाई पेशवे या दोनच खलनायिका आम्हाला ठाऊक होत्या. एकदा आम्ही खून होणाऱ्या मुलाच्या शर्टाच्या आत लाल पाणी भरलेला फुगा ठेवला होता. त्याच्या छातीवर मोठा फोड आल्यासारखं ते दिसत होतं. ठ्ठो ऽ ऽ” असा पिस्तुलाचा (म्हणजे तोंडाचा) आवाज झाल्यावर त्याने टाचणी लावून फुगा फोडायचा अशी कल्पना होती. पण प्रत्यक्षात मात्र “ठ्ठो ऽ ऽ” नंतर शर्टमधून टाचणी लावून फुगा फुटेपर्यंत मध्ये बराच वेळ गेला. त्यामुळे “ठ्ठो ऽ ऽ” नंतर रक्त दिसेपर्यंत चार - पाच मिनिटे काही घडलंच नाही. शेवटी प्रेक्षक, “आता मर की” म्हणाले !

बारा वर्षे वयानंतर मी हळूहळू नाटकमंडळीतून बाहेर पडले. आता मला कळतंय की, लहानपणाच्या अंताची ती नांदी होती. त्यानंतर मग मी शाळेत - कॉलेजात गॅदरिंगमध्ये नाटकात कामे केली. त्यात भांडण वगैरेही झाली. पण खडूचा तो मेकअप करून, चादरीचे पडदे बनवून, बसची तिकीटे वापरून केलेल्या लहानपणीच्या नाटकांची जी काय और मजा होती ती पुन्हा कधी आलीच नाही.

(पूर्वप्रसिध्दी एकता)